MHPU240015282024

**<u>रे. मु. नं. १५५/२०२४</u>**

**भाउसाहेब नानाभाउ कापडी**
**विरुद्ध**
**सत्यभामा विष्णु लबडे**

## <u>निशाणी क्र.१२,१४ व १६ वरील आदेश</u>

**०१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी सत्यभामा विष्णु लबडे या मयत झाल्याने झालेला अबेटमेंटचा आदेश रदद होवून त्यांच्या कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून अभिलेखावर त्यांच्या नावापुढे ‘मयत’ असे लिहुन दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथानानुसार, प्रतिवादी सत्यभामा विष्णु लबडे या दि. २४.१०.२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या हक्क, अधिकारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच, अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, वारस रेकॉर्डवर घेण्याचा व तशी दुरुस्ती करण्याचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. परंतु, दाव्याचे नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी सत्यभामा विष्णु लबडे या दि. २४.१०.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसते. प्रस्तुतचे अर्ज दि.१८.०१.२०२५ रोजी दाखल केल्याचे दिसतात. वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. दाव्याचा गुणदोषांवर निर्णय होण्याकरीता सदर अर्जाप्रमाणे प्रतिवादी सत्यभामा विष्णु लबडे यांचे वारस अभिलेखावर घेउन त्याबाबतची दुरुस्ती महत्वाची दिसून येते. वादी यांनी त्यांचे अर्जातील सत्यतेकरीता नि.क्र.१३,१५ व १७

प्रमाणे त्यांचे प्रतिज्ञापत्र व नि.क्र.११ चे यादीसोबत मयत प्रतिवादीचे मृत्यप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सबब, अशा परिस्थितीत त्यांच्या कायदेशीर वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने प्रतिवादी सत्यभामा विष्णु लबडे यांचे नावासमोर मयत असे नमुद करून त्यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत, सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, प्रस्तुत दाव्यात सर्व पक्षकारांना सामील करुन घेतल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. वादीचा सदरचा अर्ज नि.क्र.१२,१४ व १६ हे मंजूर करण्यात येतात.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अर्जाप्रमाणे १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत दावे अर्जात/सरनाम्यात दुरुस्ती करावी.

MEGHA SHASHIKANT MALI

Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.01.31 11:35:13 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

दि. १८/०१/२०२५
स्थळ : घोडेगांव